सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.)
वाल्मी परीसर, कांचनवाडी, -४३१००२

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

माहितीचा अधिकार

☏ : ०२४०-२३७९२२५
E-mail:com.swcabad@maharashtra.gov.in

## :- जाहीर सूचना-::-

मृद व जलसंधारण विभागाच्या जलसंधारण अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) पदासाठी दि. 14 ते 16 जुलै, 2024 या कालावधीत परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षा मे. टाटा कन्सलटन्सी सर्विसेस लिमीटेड कंपनीद्वारे घेण्यात आली होती. सदर परीक्षेचा निकाल मृद व जलसंधारण विभागाच्या संकेतस्थळावर दि. 19 सप्टेंबर, 2024 रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

सदर परीक्षेच्या जाहिराती मध्ये बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रीकेचे मुल्यांकन करतांना (नकारात्मक गुणपध्दत) अवलंबण्यात येईल व प्रत्येक चुकीच्या उत्तरा करिता २५ टक्के किंवा ¼ एवढे गुण, एकुण गुणांमधुन वजा/कमी करण्यात येतील असे नमुद आहे. प्रत्येक प्रश्नासाठी २ गुण देण्यात आले आहेत, त्यानुसार चुकीच्या उत्तरासाठी 25 टक्के किंवा ¼ म्हणजे 0.50 गुण कमी करणे आवश्यक होते. मात्र, चुकीच्या उत्तरा करिता 0.25 गुण कमी केल्यामुळे सदर निकालात गणकीय त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब, जाहिराती प्रमाणे निकालामध्ये सुधारणा करुन प्रत्येक चुकीच्या उत्तरा करिता 25 % किंवा ¼ एवढे गुण, एकुण गुणांमधुन वजा / कमी करण्यात येवून सुधारीत निकाल तयार करण्यात येत आहे. त्यानुसार, सुधारीत निकाल लवकरच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची सर्व संबंधित उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

दि. 20 सप्टेंबर, 2024.

अध्यक्ष, राज्यनिवड समिती तथा
आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा)
छत्रपती संभाजीनगर